# वाहन चोरी टाळण्यासाठी घ्यावयाची खबरदारी

1. वाहने सुरक्षित पार्किंगमध्येच पार्क करा.
2. वाहनांना वाहन चोरीविरोधी सुरक्षा यंत्रणा बसवून घ्या. उदा. जीपीएस, गिअर लॉक इत्यादी.
3. वाहनावर चालक नेमण्यापुर्वी त्याची पोलीसांकडुन चारित्र्य पडताळणी करुन घ्या. त्याच्या ड्रायव्हिंग लायसन्सची प्रत, सध्याच्या राहण्याचा व मुळगांवचा पत्ता, फोटो तसेच त्याच्या नातेवाईकांची माहिती आपल्याकडे ठेवा.
4. जुनी गाडी विकत घेताना, गाडी चोरीची तर नाही ना ? याची प्रथम पडताळणी करा. त्या गाडीचा इंजिन नंबर, चेसिस नंबर, गाडीचा मालक इत्यादीबाबत माहिती घेवुन गाडीच्या कागदपत्रांची स्वतः तपासणी करा.
5. कमी किंमतीत वाहन विकणारा एजंट हा चोरीचे वाहने विकण्याची षक्यता असल्याने असा कोणी एजंट आढळून आल्यास त्याची माहिती पोलीसांना दया.
6. गाडी सर्व्हिसिंग करण्यासाठी देताना तेथे काम करणा–या अपरिचित व्यक्तिकडे गाडीची चावी सुपूर्त करू नका. चावी काउंटरला जमा करून त्याची पोचपावती घ्या. काही वेळा डयुप्लिकेट चावी बनवुन नंतर गाडीची चोरी झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत.
7. इमारतीमध्ये सुरक्षित पार्किंग नसल्सास तेथे सुरक्षा रक्षकांची नेमणूक करा.सदर रक्षकांचीदेखील पोलीसांमार्फत चारित्र्य पडताळणी करुन त्यांची परिपुर्ण माहिती सोसायटीच्या नोंदवहीत ठेवा.

जागरुक नागरिक बना, पोलीसांना सहकार्य करा.